




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २३ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक ८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये







# राज्यातील मार्डच्या डॉक्टरांचा संप मागे, एकनाथ शिंदे यांना मोठं यश

### एकनाथ शिंदे यांनी काय निर्देश दिले?

या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाचे निर्देश दिले. “वसतिगृह उपलब्धेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने आणि मुंबई महापालिकेने भाड्याने इमारती उपलब्ध करून घेण्याचे नियोजन करावे, वसतिगृहांचे नूतनीकरण तेथील स्वच्छतागृह, सीसीटीव्ही, वीज अशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आढावा घ्यावा. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालयाशी संलग्न परिसरांच्या सुरक्षेबाबत फेर आढावा घेण्यात यावा. सुरक्षेसाठी विविध यंत्रणांकडून घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांना पोलीस विभागाने प्रभावी सुरक्षेबाबत प्रशिक्षण द्यावे”, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.



निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची संघटना मार्ड, तसेच मुंबई महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील संघटना बीएमसी-मार्डच्या डॉक्टरांनी अखेर संप मागे घेतला होता. कोलकाता येथे घडलेल्या घटनेनंतर डॉक्टरांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यामुळे राज्यातील डॉक्टरांच्या या दोन संघटनांनी संप पुकारला होता. अखेर या दोन्ही संघटनांच्या डॉक्टरांची आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा झाली. यानंतर या संघटनांनी आपण संप मागे घेत असल्याचं जाहिर केलं. तर राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत सर्वंकष आढावा घेण्यात यावा, त्यासाठी राज्यस्तरावर, तसेच मुंबई शहरातील महाविद्यालयांसाठी समन्वनासाठी पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्त करण्यात यावी. तसेच निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांना निवास व्यवस्था, वसतिगृह उपलब्ध करून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करावेत. या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे विद्यावेतन नियमितपणे मिळेल, असे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिले. निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत राज्यातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची संघटना मार्ड, तसेच मुंबई महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील संघटना बीएमसी-मार्ड या संघटनेच्या विविध मागण्यांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या ‘वर्षा’ शासकीय निवासस्थानी बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेबाबत आणि मागण्यांवर घेतलेल्या निर्णयानंतर या दोन्ही संघटनांनी सुरु असलेला संप मागे घेत असल्याचे जाहीर केले. उद्या रक्तदान शिबीरात रक्तदान करून हा संप मागे घेणार असल्याचे या दोन्ही संघटनांच्या अध्यक्ष आणि उपस्थित प्रतिनिधींनी जाहीर केले.

या बैठकीस राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्तमुख्य सचिव विकास खारगे, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर आदी उपस्थित होते.



## दैनिक वादळ वार्ताच्या बातमीचा दणका अनं ताहेर खुरेशीच्या अंदोलनाला आले यश.

## केज न.प.चे सुस्त प्रशासन अडीज वर्षाने झाले खडबडुन जागे ; घाणीचे साम्राज्य हटविण्याच्या तीव्र हालचालीला आला वेग

प्रतिनिधी केज ।

दैनिक वादळ वार्ताला बातमी आली आणि केजचे नगरपंचायत प्रशासन खडबडूनजागेझालेआणियुद्धपातळीवर घाणीचे साम्राज्य हटवण्यासाठी तीव्र हालचालीला वेग आला. याबाबत सविस्तर वृत्तांत असा की काल दिनांक 21/07/2024 या दिवशी प्रभाग 16 मध्ये काँग्रेसचे शहर अध्यक्ष ताहेर कुरेशी यांनी मागासवर्गीय वस्तीमध्ये घाणीचे साम्राज्य ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी एक बॅनर लावले त्या बॅनर वरती केज नगरपंचायत आणि यश कंट्रक्शन यांच्या नावावरती चपलांचा हार घालून जाहीर निषेधाचे बॅनर लावले.या अनुषंगाने आलेली दैनिक वादळ वार्ता मध्ये बातमी याचा दणका प्रशासनाने घेतला व आज 22 ऑगस्ट रोजी केज नगरपंचायतचे प्रशासन सदरील ठिकाणचे घाणीचे साम्राज्य काढण्यासाठी त्या जागेवरती दाखल होऊन स्वच्छता करण्यास सुरुवात केली आहे. तसेच सदरील स्वच्छता हि स्वच्छ होण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा वेळ लागणार असल्याचे कळते. या आगळ्यावेगळ्या आंदोलनामुळे काँग्रेसचे शहराध्यक्ष ताहेर खुरेशी केज शहरातील जनतेच्या चर्चेत आले आहेत.व त्यांच्या आगळ्यावेगळ्या आंदोलनाची सर्व केज शहरात जोराची चर्चा सुरू आहे.

## भाजपा चे राज्य कार्यकारणी सदस्य आणि किसान मोर्चा चे प्रदेश उपाध्यक्ष रमेश पोकळे यांनी घेतली मनोज जरांगे पाटिलयांची भेट

### रमेश पोकळे यांनी जरांगे पाटिल यांच्याकडे दिला विधान सभेच्या उमेदवारीचा प्रस्ताव...

### बीड विधान सभेच्या जागेसाठी इच्छुक

बीड दि. 22 (प्रतिनिधी) -

भाजपा चे राज्य कार्यकारणी सदस्य आणि किसान मोर्चा चे प्रदेश उपाध्यक्ष रमेश पोकळे यांनी अंतरवाली सराटी जावून मनोज जरांगे पाटिल यांची भेट घेतली.. आगामी विधान सभा निवडणुकीच्या अनुषंगाने बीड विधान मतदार संघाचा प्रस्ताव दिला आहे.तसेच मनोज जरांगे पाटिल यांना प्रोफाईल दिली आहे. तब्बल अर्धा तास चर्चा केली..तसेच पाटिल जो निर्णय घेतील त्या सोबत राहण्याचीइच्छा व्यक्त केली.. विशेष रमेश पोकळे यांनी या



अगोदर भाजपच्या अनेक पदावर काम केलेले आहे तसेच स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या सोबत दोन टर्म भाजपचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले. पदवीधर मतदारसंघ व शिक्षक मतदारसंघात दोन वेळा निवडणूक लढवली आहे. आता ते फडणवीस यांचे निकटवर्ती आहेत. तसेच भाजपच्या किसान प्रदेश उपाध्यक्ष आहेत व राज्य कार्यकारिणीचे सदस्य देखील आहेत. त्यामुळे आज त्यांनी पाटील यांचे भेट घेतल्याने चर्चेला उधाण आले आहे.. या अगोदरही भाजपच्या अनेक नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे.. भाजपासोबत असलेला मराठा आज अस्वस्थ आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे..

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सिरसाळा युवक शहराध्यक्षपदी अब्बास पठाण यांची निवड

परळी (वार्ताहार

सिरसाळा येथील युवक नेते अब्बास पठाण यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सिरसाळा युवक शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली असून या निवडीचे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सौ सुदामतीताई गुट्टे यांच्या हस्ते देण्यात आले. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मभूषण खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे हात बळकट करून त्यांचा विचार तळागाळापर्यंत पोहोचले अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त करण्यात आली. या निवडी प्रसंगी उपस्थित तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार परळी युवक शहर अध्यक्ष सय्यद फिरोज सिरसाळा येथील युवक नेते फिरोज भाई शेख, इमरान शेख उपस्थित होते.



# अत्याचारी नराधमांना बंदुकीने गोळ्या घालून जागीच ठार करा ! (सरकारकडे रोहन गलांडे पाटील यांची निवेदनाद्वारे मागणी)

केज/प्रतीनिधी

केज तालुक्यातु बदलापुर येथील झालेल्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच कोलकत्ता येथील हॉस्पीटलमध्ये नर्सवर झालेल्या अत्याचार व अशा प्रकारच्या अत्याचार , बलात्कार, छेडछाड, महीलांना जिवे मारणाऱ्या, नराधमांची संख्या भारतात , राज्यात वाढत जात आहे तरी असा प्रकार केल्यास नराधमाला बंदुकीच्या गोळ्या घालून जागीच मारण्यात यावे अशी विनंती केंद्र व राज्य शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की तहसिलदार साहेब केज यांच्या मार्फत केंद्र व राज्य शासनाला रोहन गलांडे पाटील (अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष) निवेदनाद्वारे विनंती करतो की बदलापुर येथील झालेल्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच कोलकत्ता येथील हॉस्पीटलमध्ये नर्सवर झालेल्या अत्याचार व अशा प्रकारच्या अत्याचार ,



बलात्कार, छेडछाड, महीलांना जिवे मारणाऱ्या, नराधमांची संख्या भारतात , राज्यात वाढत जात आहे त्यामुळे भारतातील, राज्यातील महीला,मुली , असुरक्षितन रहाता सुरक्षित असाव्यात म्हणून व होणाऱ्या अत्याचाराला नियंत्रण ठेवण्यासाठी असा प्रकार केल्यास नराधमाला बंदुकीच्या गोळ्या घालून जागीच मारण्यात यावे अशी विनंती केंद्र व राज्य शासनाला निवेदनाद्वारे विनंती करतो त्यामुळे भारतात , महाराष्ट्रराज्यात असे अनुचित प्रकार घडणार नाही व अशा प्रकारे होणारे अत्याचार थांबवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाला निवेदनाद्वारे विनंती करतो की बदलापुर, कोलकत्ता, येथील घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने यापुढे अत्याचार करणाऱ्या नराधमांना जागीच बंदुकीच्या गोळ्या घालून ठार करण्यात यावे असे आदेश केंद्र व राज्य शासनाने पोलिस प्रशासनाला देण्यात यावे अशी विनंती निवेदनाद्वारे शासनाला रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे.

# बदलापूर प्रकरणात आरोपींविरुद्ध त्वरित खटला चालवून कठोर शिक्षा देण्याची मागणी

## जमात-ए-इस्लामी हिंद, महिला विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनास निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बदलापूर, ठाणे येथील दोन लहान मुलींचे लैंगिक शोषण आणि बलात्काराच्या प्रयत्नाचा तसेच पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील आर. जी. कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षु डॉक्टरच्या बलात्कार-हत्या प्रकरणाचा निषेध करत आरोपींविरुद्ध त्वरित खटला चालवून कठोर शिक्षा देण्याची मागणी जमात-ए-इस्लामी हिंद, बीड जिल्हा, महिला विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनास निवेदन देण्यात आले आहे. निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की बदलापूर, ठाणे येथील ३ आणि ४ वर्षांच्या दोन लहान मुलींचे शाळेत लैंगिक शोषण आणि बलात्काराच्या प्रयत्नाचा तसेच आर.जी. कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षु डॉक्टरच्या क्रूर बलात्कार व हत्येचा निषेध व्यक्त करत आहोत. बदलापूर प्रकरणात, आम्ही आरोपींविरुद्ध त्वरित खटला चालवून कठोर शिक्षा देण्याची मागणी करतो. ज्या शाळेत हा प्रकार घडला त्या शाळेच्या अधिकाऱ्यांना सुरक्षा आणि संरक्षानिष्कर्षांचे पालन न केल्याबद्दल (स्त्री परिचारिका आणि सीसीटीव्ही कॅमेरे नसणे) दोषी ठरवून कारवाई करण्यात यावी. ज्या पोलिसांनी एफआयआर नोंदविण्यात उशीर केला त्या बदलापूर पोलिस अधिकाऱ्यांवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी. कोलकातामधील प्रशिक्षु डॉक्टर प्रकरणात, पीडितेचे शरीर अनेक जखमांसह आढळले असल्याची बातमी वाचून आम्ही हादरलेलो आहोत, ज्यात लैंगिक अत्याचाराचे आणि गळा आवळल्याचे पुरावे आहेत. या दोन्ही गुन्ह्यांच्या भयंकर स्वरूपामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे आणि भारतातील महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा तातडीने चर्चेला घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, विशेषतः शाळा, महाविद्यालये आणि काम करणाऱ्या मुली आणि महिलांमध्ये.आम्ही खालील मुद्द्यांवर तात्काळ आणि ठोस कारवाईची मागणी करतो:

१. सखोल चौकशी: या प्रकरणांची सर्वसमावेशक चौकशी करून पीडितांना न्याय मिळवून देण्याची आणि कायदाव्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची आमची मागणी आहे.

२. सुरक्षा उपायांचा विकास : सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये कडक सुरक्षा नियमावली राबविणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यामध्ये सुरक्षा कॅमेरे, चांगली प्रकाशयोजना, आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रणालींचा समावेश असावा.

३. जनजागृती मोहिमा: महिलांचा आदर वाढविण्यासाठी आणि लैंगिक हिंसाचाराबद्दल जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक उपक्रमांची अत्यंत आवश्यकता आहे. समाजाच्या स्तरावर सहमतीच्या महत्त्वाविषयी आणि महिलांविरुद्ध हिंसाचाराचे गंभीर परिणाम याबद्दल जागरूकता कार्यक्रम आयोजित केले जावेत.

४. पीडितांना सहाय्यता: लैंगिक हिंसाचाराच्या पीडितांसाठी सल्ला, कायदेशीर सहाय्यता आणि वैद्यकीय काळजी यांसह समर्पित सहाय्यता प्रणालींची स्थापना करणे आवश्यक आहे, ज्यामुळे पीडितांनी पुढे येऊन गुन्ह्यांची नोंद करणे सोपे होईल.

५. कायदा अंमलबजावणीतील जबाबदारी: कायदा अंमलबजावणी यंत्रणेमध्ये जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करतो, ज्यामुळे सर्व अधिकारी नागरिकांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य पार पाडतील आणि महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराच्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करतील.

६. सदाचरण: आम्ही समाज आणि सरकारला शाळांमध्ये नैतिक शास्त्राची शिकवण सुरू करण्याची आणि चरित्र निर्माणाच्या कामावर भर देण्याची विनंती करतो. मुख्य प्रवाहातील माध्यमे, सामाजिक माध्यमे आणि मनोरंजन उद्योगात उघडपणे चालवले जाणारे अश्लीलता, अशिष्टता, महिलांचे वस्तूकरण आणि अश्लीलतेला आळा घालण्याची आणि त्याचे नियंत्रण करण्याची गरज आहे. लैंगिक गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे एक पवित्र आणि परमेश्वर-भीत समाज निर्माण करणे, जिथे महिलांचा सन्मान केला जातो आणि त्यांना त्यांचे खरे आणि प्रतिष्ठित स्थान दिले जाते. आम्ही आशा करतो की आपण आमच्या चिंता गांभीर्याने घ्याल आणि भविष्यात अशा अमानुष घटनांचा पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आवश्यक पावले उचालाल. या वेळी डॉ. शाहीन आमेर अली जिल्हा संघटक, महिला विभाग ,जमात ए इस्लामी हिंद व खैसर सुलताना खदिरोद्दिन शहर संघटक, महिला विभाग जमात-ए-इस्लामी हिंद, बीड सह अनेक महिला सदस्य आणि प्रा. शफीक हाशमी, डॉ सिराज खान आरजु आदी उपस्थित होते.

# परळी व आष्टी येथे होणाऱ्या कृषी महोत्सावाचे स्वागत, पण त्या मध्ये हमी भाव आणि विमा कंपनीचे स्टॉल असावे:-भाई विष्णुपंत घोलप

**मुंबई । प्रतिनिधी**

पाटोदा(प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात परळी येथे २१ ऑगस्ट पासून कृषी महोत्सव तसेच आष्टी येथे 29 ऑगस्ट पासून कृषी प्रदर्शन होत आहे. त्या साठी बीड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्ष दोन्ही आयोजकांचे स्वागत करत आहे. परंतु शेतकऱ्यांना हमी भावाबद्दल माहिती आणि विमा कंपनी बद्दल माहिती देणारे स्टॉल(कार्यालय) असावेत तरच कृषी महोत्सव आणि कृषी प्रदर्शनाचा खरा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल असे मत आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील पुर्वेकडे कृषी मंत्र्यांच्या विधानसभा मतदार संघात राज्यस्तरीय कृषी महोत्सव होत आहे. तर बीड जिल्ह्याच्या पश्चिमेकडे माजी आमदार यांच्या पुढाकारातुन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन होत आहे. या कार्यक्रमामुळे शेतकरी आणि शेतीला जोडधंदा असणाऱ्या समुहाचे फायदे होतील असे आयोजकांना वाटत आहे. त्यांचे आम्ही शेकापच्या वतीने स्वागत करतो. परंतु त्या कृषी महोत्सव किंवा प्रदर्शनात शेतकऱ्यांच्या हमी भावासाठी माहिती कार्यालय(स्टॉल) असल्यास शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर हमी भाव कसा देण्यात येतो याची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना मिळेल. आज उदा.दाखल सोयाबीन चा विचार केला तर सोयाबिनचा उत्पादन खर्च किती? कोणत्या कृषी विद्यापिठाने तो तयार केला त्यांनी राज्याच्या कृषीमुल्य आयोगाकडे केंव्हा पाठविला आणि राज्यकृषी मुल्य आयोगाने राष्ट्रीय कृषी मुल्य आयोगाकडे केंव्हा पाठविण्यात येतो. केंद्रीय स्तरावर हमी भाव ठरविण्याचे अधिकार कोणाला, शासनाच्या हमी भावापेक्षा बाजारात कमी भाव शेतकऱ्यांना मिळत असल्यास त्या वर शासन नेमके काय करणार, जर शासनाने हमी भावाने खरेदी चालु केली तर त्या वर २४ तासाच्या आत पैसे देण्याची तयारी राज्य किंवा केंद्र शासनाकडे आहे काय? तशी अर्थ संकल्पात तरतुद करण्यात आली आहे काय? आज सोयाबीनच्या हमी भावापेक्षा ७०० ते ८०० रुपयांनी सोयाबिन कमी भावाने बाजारत विकले जात आहे. या वर शासन काय करत आहे याची माहिती शेतकऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना या वर विमा कंपनी आपल्या जिल्ह्यासाठी कोणती, तिचे नाव, त्यांचे कार्यालय कृषी प्रदर्शनात किंवा महोत्सवात असावे जेणे करुन शेतकऱ्यांना याची माहिती मिळेल.



उदारणार्थ सांगायचे झाल्यास बीड जिल्ह्यात २०२३-२४ चा खरीप हंगाम ८० ते ९०% कमी पावसामुळे वाया गेला. त्या वर कृषीमंत्री म्हणत आहेत की, ४०० कोटी विमा आपणाला मिळतोय. बीड साठी असणाऱ्या अग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीने सुरवातीला २५% अग्रीम म्हणून विमा काही शेतकऱ्यांना दिला परंतु पालकमंत्री यांनी आपला बीड जिल्हा दुष्काळात आहे असे जाहीर केले होते. विमा कंपनीने प्रत्येक पिकाचे उंबरठा उत्पादन किती दाखविले ? बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोणत्या पिकाला किती टक्के विमा दिला किंवा देणार या बद्दल गेल्या वर्षभरापासून शेतकऱ्यांना माहिती मिळत नाही. १(एक) रुपयात शेतकऱ्यांचा विमा भरुन घेतल्या जातो त्या मध्ये राज्य शासनाचा भार किती व केंद्र शासनाचा हिस्सा किती राज्य व केंद्राचे एकूण किती रुपये कंपनीला मिळाले याची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासाठी कृषी महोत्सवामध्ये किंवा कृषी प्रदर्शनात विमा कंपनीचे माहिती कार्यालय असावे. ई-पीक पहाणी मध्ये ७० ते ८० टक्के शेतकऱ्यांना स्वतः सहभाग नोंदवता येत नाही. पिकाचे नुकसान झाले तरी विमा कंपनी ७२ तासाच्या आत आणि ई-पिक पहाणी शिवाय तक्रार घेत नाही. तसेच कृषी महोत्सवात पशु संवर्धन विभागाचे माहिती कार्यालय असावे आज बीड जिल्ह्यात जनावरांच्या दवाखान्यात संडासची सुध्दा गोळी किंवा जखम झाल्यास आयोडिन औषधही मिळत नाही असे एक नाही तर अनेक विषय आपल्या समोर मांडता येतील असे शेकापचे भाई विष्णुपंत घोलप यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना मत व्यक्त केले.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत रांजणीचा मुलींचा कबड्डी संघ तालुक्यातून सर्वप्रथम




जालना/असलम कुरेशी घनसावंगी तालुक्यातील तिर्थपुरी येथे आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत रांजणी येथील श्री सरस्वती भुवन हायस्कूलच्या 19 वर्ष वयोगटातील मुलींच्या कबड्डी संघाने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने एस.पी. पाटील इंग्लिश स्कूल तिर्थपुरी येथे आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्री सरस्वती भुवन प्रशाला रांजणीच्या 19 वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने घनसावंगी तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला. या संघातील विजयी खेळाडूंचे शालेय समितीचे अध्यक्ष गौतमभाऊ देशमुख, प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर बिरहारे, घनसावंगीचे तालुका क्रीडा अधिकारी श्री कडुळे, क्रीडा शिक्षक एस.आर .जहागीरदार, सहशिक्षक दत्तात्रय अंभोरे, मोहन चव्हाण यांच्यासह प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. तसेच जिल्हा स्तरावर चांगल्या कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# खर्ड्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन सोहळा.

खर्डा ( प्रतिनिधी ) येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय, खर्डा. रासेयो विभागाच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी खर्डा पोलीस स्टेशन, खर्डा येथे जाऊन पोलीस बांधवांना औक्षण करत रक्षाबंधन केले तसेच बस स्थानक परिसरात महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे बस चालक- वाहक, खाजगी ट्रक चालक- वाहक, खर्डा येथील पत्रकार संघ सदस्य यांचे देखील याप्रसंगी रक्षाबंधन करण्यात आले. या अगोदर देखील महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने सीमेवरील जवानांना पोस्टाद्वारे राखी पाठवण्यात आलेल्या आहेत. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे खर्डा परिसरात महाविद्यालयीन




विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. यावेळी उपस्थित महाविद्यालय प्राचार्य प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे, प्राचार्य. चंद्रकिशोर बारटक्के, रासेयो विभाग प्रमुख प्रा. मोहसीन शेख,प्रा. भारत मेंगडे तसेच महाविद्यालय प्राध्यापक, विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येत उपस्थित होता. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष. विजयसिंह गोलेकर, उपाध्यक्ष. प्रकाश गोलेकर यांनी रासेयो विभागाचे कौतुक केले.

प्रतिक्रिया -1

महाविद्यालयाने राबविलेल्या रक्षाबंधनाचा उपक्रम हा खूपच स्तुत्य असा आहे, यामुळे कर्तव्य सामाजिक बांधिलकी अधिकच दृढ होण्यास नक्कीच मदत होईल.
स. पो.नी - विजय झंझाड.

प्रतिक्रिया -2

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची सामाजिक भावना नक्कीच उंचावेल, या अगोदर देखील विद्यार्थ्यांनी वृक्षाला राखी बांधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे. तसेच महाविद्यालयात विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येतात.
प्राचार्य प्रा.डॉ. चंद्रसेन आवारे

# संभाजी ब्रिगेडचा उद्या पुणे येथे वर्धापन दिन

## वर्धापन दिनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे :-संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष प्रा.महेंद्र मोरे

**बीड प्रतिनिधी :-** संभाजी ब्रिगेड राजकीय पक्षझाल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे येथे वर्धापन दिनानिमित्त लोकशाही जागर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार (दि. २३) ऑगस्ट रोजी पुणे येथे बालगंधर्व रंग मंदिरात हा मेळावा पार पडणार आहे, देशातील व राज्यातील राजकीय परिस्थिती, सामाजिक ध्रुवीकरण, जातीय व धार्मिक दंगली आणि राजकारण, या विषयावर वैचारीक प्रबोधन होणार आहे. संभाजी ब्रिगेड व उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना यांची युती असून, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी सत्तेत येण्यासाठी एक जीवाने प्रयत्न करण्याच्या दृष्टीने संभाजी ब्रिगेड पक्षप्रमुख ॲड. मनोज आखरे, महासचिव सौरभ खेडेकर, प्रवक्ते गंगाधर बनबरे, डॉ. शिवानंद भानुसे, डॉ. संदीप कडलग, प्रदेश उपाध्यक्ष अभिमन्यू पवार आदी मार्गदर्शन करणार आहेत.



बेरोजगारी, महागाई, शेतकरी आत्महत्या, हे निवडणुकीचे मुद्दे असताना सत्ताधारी जातीय व धार्मिक दंगली घडवून सामाजिक अशांतता निर्माण करत आहेत. सुशिक्षित तरुण पुणे मुंबई या ठिकाणी जाऊन एमपीएससी, यूपीएससी परीक्षेची तयारी करत आहेत. मात्र, केंद्रातील मोदी सरकार लेट्रल एंट्री नावाखाली आयएस होऊन नियुक्ती होण्याऐवजी सरळ नियुक्ती देऊन लोकशाही, संविधान, आरक्षण संपवण्याची तयारी करत आहे. शेतकरी शेतमालाला हमी भाव मिळण्यासाठी आंदोलन करत असताना सरकार मात्र डोळेझाक करत आहे. देशातील व राज्यातील सरकारे लोकशाहीचा गळा अवळत आहेत. या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडचा लोकशाही जागर मेळावा दिशादर्शक ठरणार, बीड येथून व राज्यातून कार्यकर्ते पदाधिकारी यांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रा.महेंद्र मोरे यांनी केले..

# विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी संभाजी पाटील विभूते यांची निवड



नायगांव । हानुमंत चंदनकर नायगांव तालुक्यातील नरसी येथील बालाजी नगर विग्रहार्ता गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते आयचरचे चालक मालक श्री संभाजी पाटील विभूते यांची सर्वानुमते निवड करण्यात आली संभाजी पाटील विभूते हे गेल्या अनेक वर्षापासून धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतात व सर्वाच्या सुखदु:खात सहभागी होत असतात त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवतात ते गेली अनेक वर्षे गणेश मंडळात पुजा,अभिषेक, आरती, प्रसाद, नैवेद, आदी कामे त्यांनी पाहतात संभाजी पाटील विभूते यांच्या निवडीचे अनेकांनी अभिनंदन केले आहे

# राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाची कृषिमंत्री धनंजय मुंडेंकडून पाहणी

## साडेतीन तास कृषीमंत्री रमले स्टॉल्स पाहण्यात, ३३५ स्टॉल्सला दिल्या भेटी

परळी वैद्यनाथ (दि.22) - राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात प्रथमच परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सव अंतर्गत भरवण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन समारंभ संपल्यानंतर भेट देऊन पाहणी केली. कृषी क्षेत्रात लागलेले नवनवीन शोध, नवनवीन तंत्रज्ञान, नवीन आधुनिक अवजारे यांसह विविध शेती उत्पादने आदींची शेकडो दालने (स्टॉल्स) उभारण्यात आली असून नॅनो खतांची ड्रोन द्वारे फवारणी करण्याची प्रात्यक्षिके सुद्धा येथे दाखवण्यात येत आहेत. या स्टॉल्सला भेटी देण्यामध्ये कृषिमंत्री धनंजय मुंडे हे तब्बल साडेतीन तास रमले होते. जवळपास 7.30 ते 11 वाजेपर्यंत या वेळेत त्यांनी जवळपास 335 स्टॉल्सला भेटी देऊन पाहणी केली व त्यांच्याकडील उत्पादनांची व तंत्रज्ञानाची माहिती घेतली. चारही कृषी विद्यापीठाचे स्टॉल्स या ठिकाणी उभारले




असून, तेथील उपक्रमांचीही मुंडेंनी माहिती घेतली. या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या स्टॉल्समध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्यासाठी आणि शेतीमध्ये अधिक समृद्धी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक बाबी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी व लाभ मिळवावा, असे आवाहन याप्रसंगी धनंजय मुंडे यांनी केले आहे. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक श्री.मुळे, आत्माचे जिल्हा प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांसह अधिकाऱ्यांनी श्री मुंडे यांना माहिती दिली. प्रसंगी पदाधिकारी व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली, त्यालाही शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद लाभला. हा उपक्रम पुढील चारही दिवस अविरत सुरू राहणार आहे.

### स्टॉल ठिकाणीच धनंजय मुंडे यांचा नाश्ता

काल सकाळपासूनच कार्यक्रमाची लगबग होती. सायंकाळी उशिरापर्यंत जेवणालाही वेळ मिळाला नाही, त्यामुळे सायंकाळी स्टॉल पाहत असतानाच धनंजय मुंडे यांनी स्टॉलवर असलेले विविध मिलेटपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, फळे यांचा शेतकऱ्यांच्या सोबत आस्वाद घेतला.

# जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वकष माहिती कोर्स २४ भरण्याचे आवाहन

**बीड : प्रतिनिधी**

बीड, दि. 21 :शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वोकष माहितीकोष 2024 तयार करण्याचे काम जिल्हा सांख्यिकी कार्यालय बीड मार्फत सुरू आहे. तरी जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाची व त्यांच्या आस्थापनेवरील नियमित, निमितेत्तर, रोजंदारीवरील, अंशकालीन मानसेवी व तदर्थ तत्वावरील असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची दिनांक 1 जुलै 2024 या संदर्भ दिनांकाची माहिती ऑनलाईन आज्ञावलीमध्ये नोंदविणे बंधनकारक आहे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या http://mahasdb.maharash-tra.gov.inin/CGE या वेबसाईटवर लिंक वर जाऊन अधिकारी व कर्मचारी यांची माहिती अद्यावत करावयाची आहे. सदर माहिती ऑनलाईन नोंदवून जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे प्रमाणपत्र 1 जोडल्याशिवाय माहे नोव्हेंबर 2024 चे देय माहे डिसेंबर 2024 ची वेतन देयके तसेच प्रमाणपत्र 2 जोडल्याशिवाय माहे फेब्रुवारी 2025 देय माहे मार्च 2025चे वेतन देयके कोषागार कार्यालयाकडून स्विकारण्यात येणार नाही याची सर्व राज्य शासकीय अहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी तसेच ज्या शासकीय कार्यालयाचे वेतन देयके कोषागारात सादर होत नाहीत अशा सर्व कार्यालयांनी देखील त्यांच्या कर्मचाऱ्यांची व रिक्त पदांची माहिती ऑनलाईन आज्ञावली द्वारे नोंदणी करून उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, बीड यांच्याकडे सादर करायचे आहेत. अधिक माहितीसाठी र.तु.कांबळे, उपसंचालक जिल्हा सांख्यिकी कार्यालय, बीड यांच्याकडे (कार्यालय दूरध्वनी 02442-222371 /मोबाईल क्रमांक 8149716031, ई-मेल आयडी – dso.beed@hotmail.com) यावर संपर्क साधावा, असे प्रसिद्धी पत्रकावदरे कळविण्यात आले आहे.

### पाटोदा नगरपंचायतच्या ढसाळ कारभारामुळे माऊली नगर वासियांना ना रस्ता,ना पाणी,ना लाईट विना खावा लागत्यात खस्ता - दादा जावळे

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा नगरपंचायत वार्ड एक मधील माऊली नगर मध्ये रस्ता नसल्यामुळे सर्वत्र चिखल मय परिसर झाल्याने येथील नागरीकांना चालणे फिरणे फार अवघड झालेले असून या भागात घाणीचे साम्राज्य वाढल्याने डेंगू चिकन गुनियाचे घराघरात रुग्ण सापडत आहे तसेच भर पावसाळ्यात नळाद्वारे आठ आठ दिवस झाले तरी पाणी येईना तर माऊली नगर मधील काही भागात विद्युत पोलवर विद्युत दिवे नाहीत या मुळे सर्वत्र अंधारच अंधार आसुन भारत स्वातंत्र्य होऊन 75 वर्षे होऊन गेली तरी पण माऊली नगर वासियांना ना रस्ता,ना पाणी,ना लाईट,विना पाटोदा नगरपंचायतच्या ढसाळ नियोजना मुळे खावा लागत्यात खस्ता अशी टिका युवानेते दादा जावळे यांनी केली आसुन पाटोदा नगरपंचायतने लवकरात लवकर उपाय योजना कराव्यात नसता पाटोदा नगरपंचायतच्या दारात लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे युवा नेते दादा जावळे यांनी दिला आहे

### सुरेश म्हेत्रे यांची राष्ट्रीय फुले ब्रिगेड अहमदनगर जिल्हा मीडिया प्रभारी पदी निवड.

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील निर्भिड पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, राजकीय विश्लेषक सुरेश म्हेत्रे यांची राष्ट्रीय फुले ब्रिगेड अहमदनगर जिल्हा मीडिया प्रभारी पदी निवड करण्यात आली असून राष्ट्रीय फुले ब्रिगेड चे प्रदेशाध्यक्ष प्रवीण बनसोडे, प्रदेश प्रभारी अमोल बारवकर, केंद्रीय कोअर कमिटी सदस्य विनोद माळी, राष्ट्रीय फुले ब्रिगेड मीडिया प्रभारी महाराष्ट्र राज्य सागर जैवाळ यांचे हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.सामाजिक जीवनात कार्य करत असताना विविध कार्यात नेहमी अग्रेसर असणारे तसेच राजकीय विश्लेषण अगदी तंतोतंत करणारे, आपले मत परखड



मांडणारे असे सुरेश म्हेत्रे सर यांची राष्ट्रीय फुले ब्रिगेड अहमदनगर जिल्हा मीडिया प्रभारी पदी निवड करण्यात येत आहे त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा असे प्रतिपादन सागर जैवाळ राष्ट्रीय फुले ब्रिगेड मीडिया प्रभारी महाराष्ट्र राज्य यांनी व्यक्त केले. निवडीबाबत बोलताना सुरेश म्हेत्रे म्हणाले की राष्ट्रीय फुले ब्रिगेड चे अहमदनगर जिल्हा मध्ये प्रचार, प्रसार तसेच समाज हिताचे काम करण्यास नक्कीच अग्रेसर राहील तसेच राष्ट्रीय फुले ब्रिगेड चे विचार समाजाच्या तळागाळपर्यंत पोहचवनार असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. निवड झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# राज्य सरकार इतकेच शेतकरीही अलर्ट!

## नमो शेतकरी महासन्मानचा चौथा हप्ता व ई-पीक पाहणीची अट रद्द केल्याबद्दल शेतकऱ्यांनी पाठवले मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे आभार मानणारे मेसेज!

### कृषिमंत्र्यांचे भाषण सुरू असतानाच शेतकऱ्याला मिळाला नमो किसान सन्मान योजनेचा हप्ता

### धनंजय मुंडेंच्या स्वीय सहाय्यकांनी दाखवले शेतकऱ्यांचे मेसेज, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांनी हात उंचावून शेतकऱ्यांना दिली दाद

**परळी वैद्यनाथ (दि. 22)**

परळी वैजनाथ येथे बुधवारी दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन संपन्न झालेल्या कृषी महोत्सवात नमो शेतकरी महासंन्मान योजनेचा प्रत्येकी दोन हजार रुपयांचा हप्ता एका क्लिकवर 91 लाख शेतकऱ्यांना वितरित करण्यात आला. यावेळी राज्य सरकार जितके अलर्ट आहे तितकेच अलर्ट शेतकरी सुद्धा असल्याची अनुभूती आली आहे.

झाले असे की, कृषी महोत्सवाच्या उद्घाटनाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या चौथ्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पैसे मिळाले का? असे विचारताच सभागृहात बसलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचे मेसेजेस त्यांच्या मोबाईलवर आले.

त्याचबरोबर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या विनंतीवरून सोयाबीन कापूस उत्पादक



शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी ई-पीक पाहणीची घातलेली अट मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात रद्द करत असल्याचे जाहीर केले. याचा दुहेरी आनंद झालेल्या शेकडो शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच कृषी मंत्री यांचे आभार मानणारे मेसेजेस धनंजय मुंडे यांच्या स्वीय सहाय्यकांकडे पाठवले व आपले मेसेज मान्यवरांपर्यंत पोहोचवण्याची विनंती केली. धनंजय मुंडे यांच्या स्वीय सहाय्यकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना शेतकऱ्यांनी पाठवलेले ते मेसेज दाखवले असता त्यांनी समोर बसलेल्या शेतकऱ्यांना हात उंचावून दाद दिली, त्याचबरोबर कार्यक्रम संपवून निरोप घेताना अनेक शेतकऱ्यांनी भेटून देखील मुख्यमंत्री व दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले.

# राज्यस्तरीय कृषी महोत्सवास शेतकऱ्यांचा उत्साही प्रतिसाद विविध विषयावरील परिसंवाद संपन्न

**बीड प्रतिनिधी):-**

बीड दि. 22 :- परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवास शेतकऱ्यांचा उत्साही प्रतिसाद दिसून आला असून महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी विविध भागातील शेतकऱ्यांनी भेट देऊन या महोत्सवात असणाऱ्या प्रदर्शनांची पाहणी केली व माहिती घेतली. सोबतच शेतकऱ्यांसाठी उपयोगी पडणाऱ्या विविध माहितींवर आधारित परिसंवादांनाही आज सुरुवात झाली. परळी येथील स्व. पंडितअण्णा मुंडे सभामंडप, कृषी उत्पन्न बाजार समिती, कॉटन यार्ड परिसरात आयोजित या कृषी प्रदर्शनाचा आजचा दुसरा दिवस होता.

प्रदर्शनास सकाळपासूनच शेतकऱ्यांनी गर्दी केली असल्याचे चित्र दिसून आले या सर्व शेतकऱ्यांनी या ठिकाणी असणाऱ्या कृषी बाबतच्या विविध उपयोगी वस्तूंचे प्रदर्शन बघताना आपापल्या दृष्टिकोनातून नवीन शेती तंत्राची माहिती घेतली सोबतच या ठिकाणी अनेक यंत्रे नव्याने बघायला मिळाली आहेत अशी प्रतिक्रिया नोंदवली. कृषी उत्पन्न वर आधारित विविध विषयांवर परिसंवादांचे देखील या निमित्ताने आयोजन करण्यात आले आहे यातील पहिला परिसंवाद आज सकाळी डॉ. बी व्ही. आसेवार संचालक विस्तार शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.उपाध्यक्ष विभागीय कृषी सहसंचालक डॉ. टी. एस. मोटे तर संकलक डॉ के. के. झाडे होते.डॉ. एस. बी पवार यांनी चर्चासत्राचे नियोजन केले. डॉ. अरुण गुट्टे, डॉ. वसंत सूर्यवंशी व आत्माचे प्रकल्प संचालक साळवे यांची चर्चासत्राला उपस्थिती होती.



सघन कापूस लागवड केल्यामुळे सरासरी उत्पादकता पारंपारिक पद्धतीपेक्षा जास्त येते असे मत नांदेडच्या कापूस संशोधन केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद पंडागळे यांनी व्यक्त केले. देशाची कापसाची सरासरी उत्पादकता 441 किलो रुई प्रती हेक्टर आहे तर महाराष्ट्राची 331 किलो प्रतिहेक्टर इतकी आहे. मराठवाड्याची 2023-24 ची कापसाची उत्पादकता 240 किलो रुई प्रति हेक्टर इतकी आहे. तुलनेने ऑस्ट्रेलियात 2240 किलो प्रती हेक्टर, ब्राझीलमध्ये 1823 किलो रुई प्रति हेक्टर, चीनमध्ये 1950 किलो रुई प्रति हेक्टर, तुर्कस्तानमध्ये 1556 किलो रुई प्रति हेक्टर इतकी आहे. असे या तांत्रिक सत्रात वक्त्यांनी माहिती देताना सांगितले यावेळी झालेल्या अन्य

एका सत्रात सेन्सर आधारित जलसिंचन व्यवस्थेविषयी राहुरी कृषी विद्यापीठचे डॉ. वैभव मालुंजकर म्हणाले, हवामानातील घटकांची प्रत्यक्ष वेळेनुसार नोंद करण्याकरता विविध प्रकारचे स्वयंचलित हवामान संच आहेत. पिकाच्या मुळाच्या कक्षेमधील ओलाव्याच्या आधारित सिंचन वेळापत्रक या संचाद्वारे ठरविले जाते प्रवाही सिंचन, तुषार सिंचन ,ठिबक सिंचन पद्धतीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे पाणी वीज आणि मनुष्यबळाची बचत होते. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे हवामान शास्त्रज्ञ डॉ. कैलास डाखोरे म्हणाले, सद्यस्थितीत सोयाबीन कपाशी, तूर, इत्यादी वाढीच्या संवेदनक्षम अवस्था आहे. त्यामुळे शास्त्रोक्त व्यवस्थापन फायद्याचे ठरून नुकसान टाळता येते. यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठद्वारे देण्यात येणारे प्रति आठवडा कृषी हवामान संदेश पहावा. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाच्या प्रमुख व संशोधन अभियंता डॉ. स्मिता सोळंकी म्हणाल्या, बदलत्या हवामानात रुंद वरंबा सरी, टोकन पद्धत अत्यंत योग्य आहे. अति पाऊस झाल्यास पाण्याचा निचरा होऊन पीक उमरण्यापासून बचावते. अतिरिक्त पाणी जमिनीत मुरते. पावसाच्या खंडात साठवलेला ओलावा पीक वाढीस व उत्पादकता वाढविण्यास मदत करतो. या तांत्रिक सत्राचे सूत्रसंचालन डॉ. हनुमान गरुड यांनी तर आभार डॉ. गजानन गडदे यांनी मानले. या परिसरामध्ये देखील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला सोबतच राज्यातील इतर जिल्ह्यातील शेतकरी या प्रदर्शनास भेट देण्यास आज सुरुवात झाली. प्रदर्शनास एकूण पाच लाखापेक्षा अधिक शेतकरी भेट देऊन या ठिकाणी पाहणी करतील व माहिती घेतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या ठिकाणी असणाऱ्या 350 हुन अधिक दालनांमध्ये आज सर्वच ठिकाणी शेतकरी वर्गाची गर्दी जाणवत होती. या भव्य अशा आयोजनाबाबत शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. ...

# प्रियकराच्या हत्येसाठी आपल्या विद्यार्थ्यांनाच महिला शिक्षिकेने दोन लाख रुपयांची सुपारी दिली.

नाशिक । सुरेश इंगळे

नाशिक मधील पंचवटी मध्ये एका सेवानिवृत्त पोलिसाच्या मुलाची निर्घुण हत्या करण्यात आली होती, त्या हत्येच कारण समोर आलं असून ,अनैतिक प्रेम संबंधातून ही हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या वागणुकीचे धडे देणारी शिक्षिकाच या घटनेत मास्टरमाईंड असल्याचं पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आला आहे. नाशिक पंचवटी पोलिसांनी अवघ्या पाच तासात या घटनेचा छडा लावून आरोपी शिक्षिकेला अटक केली आहे.




यासंदर्भात नाशिकच्या पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता, तपासा दरम्यान निवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या मुलाची हत्या करण्यात आली असून हत्या झालेल्या तरुणाचं नाव गगन कोकाटे असं आहे. गगन हा राहणार मसरूळ परिसरातील होता. त्याच्या शेजारी राहणाऱ्या आरोपी भावना कदम या शिक्षिकेने त्याची हत्या केल्याचं उघडकीस आला आहे. गगन कोकाटे आणि आरोपी शिक्षिका भावना कदम हे दोघे शेजारीच राहत होते, त्यामुळे त्यांची ओळख झाली होती, आणि दोघांच्या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले, मात्र या प्रेम प्रकरणात गगन हा भावना यांना भेटण्यासाठी सारखा त्रास देत असायचा, त्याचा राग मनात धरून भावना कदम गगन चा काटा काढण्यासाठी आपल्याच विद्यार्थ्यांच्या मित्रांना दोन लाख रुपयाची सुपारी दिल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. भावना कदम ही विवाहित असून एका शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. त्या माध्यमातूनच तिची संकेत, मेहबूब, प्रितेश, आणि अन्य लोकांशी ओळख झाली. चारही मुले सामान्य कुटुंबातील असून सातपूर औद्योगिक वसाहतीतील कामगार आहेत. केवळ पैशाच्या लोभापाई त्यांनी गुन्हा मध्ये सहभाग घेतल्याचा त्यांनी कबूल केले आहे. भावनाने गगन याला नेहमीच्या जागेवर भेटण्यासाठी बोलावून त्या ठिकाणी संशयीत अगोदरच लपून बसले होते. गगन तिथे आल्यावर भेटण्यासाठी आल्यानंतर लपून बसलेल्या गुन्हेगारांनी त्याच्यावर अचानक हल्ला करून त्याच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून त्याची हत्या केली . पोलिसांनी संकेत रणदिवे (वय 20 ),मेहबूब सय्यद (वय 18), रितेश सपकाळे (वय 20), हे तिघेही अशोक नगर आणि तसेच गौतम दुसाने( वय 18) राहणार गंगापूर रोड, यांना ताब्यात घेतले आहे. त्यांची सखोल चौकशी केली असता गगन यांच्या हत्येसाठी भावना कदम राहणार मसरूळ हिने आम्हाला दोन लाख रुपये देण्याची कबूल केले होते .पोलिसांनी भावना कदम हिला ही ताब्यात घेतले असून पुढील चौकशी पंचवटी पोलीस करत आहे.

## बीड जिल्ह्यात बंदमध्ये सहभाग नोंदवून रिपाई एकतावादीचा भारत बंदला पाठिंबा- शैलेंद्र पोटभरे

बीड । प्रतिनिधी

सुप्रीम कोर्टाने असविधानिक वर्गीकरण करून मागासवर्गीय समाजात क्रिमिलरची अट टाकली असून ही अट रद्द करण्यासाठी व सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाच्या विरोधात आज भारत बंद पुकारण्यात आला होता या बंदमध्ये बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवून या बंदला पाठिंबा दिला असे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा प्रदेशाध्यक्ष शैलेंद्रजी पोटभरे यांनी सांगितले. या बंदमध्ये जिल्ह्यात परळी, अंबाजोगाई केज, बीड, माजलगाव आदी ठिकाणी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## साने गुरुजी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम संपन्न

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड किनवट : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित,भारत जोडो युवा अकादमी संचालित साने गुरुजी कला महाविद्यालय इस्लापुर येथे २०१९ मध्ये सुरू झालेल्या या महाविद्यालयात २०२०-२१ मध्ये बी. ए. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अभिषेक प्रकाश राठोड, सोनू केशव जाधव,शेख शीबा शेख गणी,प्रिया दिलीप भालेराव,ओमकार प्रशांत अडकिने,सिध्दांत सुभाष शेरे,या विद्यार्थ्यांना मंगळवार दिनांक २०- ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात बी. ए. पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.सोबतच




या वर्षी २०२४-२५ शैक्षणिक वर्षात बी. ए. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, प्रमुख पाहुणे महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रभाकर मुधोळकर, प्रा. डॉ. शाकी कोपरे प्रा. सुभाष काळे मंचावर उपस्थित होते. पदवीधर विद्यार्थ्यांनी तसेच नविन प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी दर्शना पांडुरंग घोगरे, पायल विनोद राठोड ह्या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे मुधोळकर यांनी या परिसरातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय व्हावी यासाठी न्यायालयीन मार्गाने संघर्ष करून हे महाविद्यालय उभे केले असुन विद्यार्थ्यांनी इतर सोप्या मार्गाने न जाता या नियमीत महाविद्यालयातून शिक्षण घ्यावे असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ बेलखोडे यांनी या महाविद्यालयातून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा या महाविद्यालयाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. शिक्षण घेत असताना आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुध्दा विद्यार्थ्यांना कायम मार्गदर्शन व मदत करत राहु असा विश्र्वास देत विद्यार्थ्यांचे स्वागत व कौतुक केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी साने गुरुजी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन कारण्यात आले सूत्रसंचालन प्रा. राजू धुळे तर प्रास्ताविक प्रा. काळे यांनी केले. प्रा रुपेश राठोड, लिपिक नितीन टापरे, नेहा राठोड, ग्रंथालय सहाय्यक रामेश्वर निमेवाड , मिरा बोनगिर, एम. डुकरेवाड इत्यादींनी परिश्रम घेतले.



## नगरपरिषद मुख्याधिकारी बीड यांच्या केबिनमध्ये कचरा टाकणार- ॲड.सदानंद वाघमारे

**बीड ।प्रतिनिधी**

नगरपरिषद बीड मुख्याधिकारी यांच्या कुचकामी धोरणामुळे बीड शहरांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरत असून साथ रोग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील कचरा हा घंटागाडी येत नसल्यामुळे नागरिक रस्त्यावर मोकळ्या जागेत घरातील कचरा आणून टाकत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर हा कचरा सडत आहे यामुळे शहरात देखील साथीचे रोग पसरत असून लहान मुलं वयोवृद्ध नागरिक हे आजारी पडत आहेत याकडे जाणीवपूर्वक नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी हे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते ॲड.सदानंद वाघमारे यांनी केला आहे. बीड नगरपरिषद या ठिकाणी घराघरातील कचरा घंटागाडीच्या माध्यमातून गोळा केला जात होता परंतु लोकसभा विधानसभा च्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लोकांना वेटीस धरून आम्ही जनतेची काळजी घेतो आमच्याकडे तुमचे प्रश्न घेऊन या आम्ही सोडवू हे दाखवण्यासाठी राजकीय स्वयंघोषित नेते आपल्या वार्डात जाणीवपूर्वक घंटागाडी येऊ नये यासाठी प्रयत्न करत आहेत की काय असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडत आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी बीड यांनी दोन दिवसात बीड शहरात घंटागाडी चालू न केल्यास त्यांच्या केबिनमध्ये बीड शहरातील घराघरातील कचरा आणून टाकणार असल्याचेही यावेळी सामाजिक कार्यकर्ते ॲड.सदानंद वाघमारे यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

## लिंबागणेश महसूल मंडळातील अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर महसूल व कृषी विभाग; स्थळ पचनामे सुरू:- डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश (प्रतिनिधी**

:- (दि.२२) बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळात गेल्या ३-४ दिवसात अतिवृष्टी झाली असुन ९५.३ मि.मि.पाऊस झाल्याची शासन दरबारी नोंद झाली आहे.दोन दिवसांपूर्वी झालेल्या अति वृष्टीमुळे मका, सोयाबीन, कांदा आदि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असुन काही पिके पाण्याखाली गेली आहेत तर काही ठिकाणी भुईसपाट झाली आहेत. अस्मानी संकटामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला असुन संबधित प्रकरणात महसूल आणि कृषी विभागाच्या आधिकारी व कर्मचाऱ्यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर पाहणी करत स्थळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके व तालुका कृषी अधिकारी बी .आर गंडे यांना काल दि.२१ रोजी केल्यानंतर व याविषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर याची दखल घेऊन आज दि.२२ गुरुवार रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि तालुका कृषी अधिकारी बी.आर.गंडे यांच्या आदेशावरून तलाठी गणपत पोतदार आणि कृषी सहाय्यक लिंबागणेश आनंद वाघ आणि रामेश्वर पेजगुडे यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली.शेतक-यांसमवेत संवाद साधला.सदरील ठिकाणी स्थळ पंचनामे करत अतिवृष्टीमुळे पाणी साचलेले असुन पिके जमिनीवर



लोळलेल्या अवस्थेत दिसुन आली असुन संयुक्त अहवाल तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि तालुका कृषी अधिकारी बी. आर. गंडे यांना पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले.

केवळ पंचनाम्याचा फार्स नको तातडीने नुकसान भरपाई मिळावी:- डॉ.गणेश ढवळे

यापुर्वीचे दुष्काळी अनुदान अद्याप शेतकऱ्यांच्या पदरात पडले नाही. शेतकरी आर्थिक दृष्ट्या संकटात आहे. अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदिल झाला असुन शासनाकडून मदतीची अपेक्षा करत असुन तातडीने पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी. केवळ पंचनाम्याचे कागदी घोडे नाचवु नये अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077